# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, मुंबई शहर

**जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१**

**ई-मेल आयडी:** gadmumbaicity@gmail.com **कार्यालय दूरध्वनी नं ०२२ २२६६५२३३ कार्यालय फॅक्स नं. ०२२-२२६६१२३९**

**सामान्य प्रशासन विभाग**

क्रमांक :जि.अ.मुं./सा.प्र/टे-२/ जि. से.सो.लेखा परि.करणेबाबत/ २५८ /२०२० दिनांक : १०/०२/२०२०

---

**प्रसिध्दी पत्रक**

विषय:- जिल्हा सेतू सोसायटी चे लेखा परिक्षण करण्याबाबत...
(आर्थीक वर्ष सन २०१२-१३, सन २०१३-१४, सन २०१४-१५,
सन २०१५-१६, सन २०१६-१७, सन २०१७-१८, व सन २०१८-१९)

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्रमांक जि.अ.मुं./सा.प्र./टे-२/जि.से.सो.लेखा
परि.करणेबात/१५५/२०२० दिनांक २०/०१/२०२०

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा सेतू सोसायटी चे लेखा परिक्षण करीता खुल्या बाजारातून सनदी लेखापालांकडून (C.A.) दरपत्रके संदर्भीय पत्रान्वये मागविण्यात आले होते. पंरतू सदर कामाकरीता किमान ३ दरपत्रके प्राप्त होणे गरजेचे असून फक्त २ दरपत्रक प्राप्त झाले आहे. याकरीता १ आठवडयाची मुदतवाढे देण्यात येत आहे.

सदर कामासाठी येणाऱ्या खर्चाचे दरपत्रक इच्छूक संस्थानी दि. १०/०२/२०२० ते दि. १५/०२/२०२० या कालावधीत कार्यालयीन वेळेत (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून) जिल्हाधिकारी, मुंबई शहर, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर, १ ला मजला, ओल्ड कस्टम हाउस, फोर्ट, मुंबई ४००००१ यांचे नावे सिलबंद लिफाफा हस्तपोच किंवा टपालाने सादर करण्यात यावे. दिलेल्या मुदतीनंतर प्राप्त होणारे दरपत्रकांचे लिफाफे स्विकारण्यात येणार नाहीत. याची नोंद घ्यवी. दिनांक १७/०२/२०२० रोजी दुपारी १२.०० वाजता प्राप्त झालेले सर्व लिफाफे मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे समक्ष त्यांचे दालनामध्ये उघडणेत येईल.

प्राप्त झालेल्या सर्व दरपत्रकांचे तुलनात्मक परिक्षण करून किमान दर असलेल्या संस्थेला दरपत्रक स्विकृतीबाबत व सदरची कार्यवाही करणेकरीता कार्यादेश देणेत येईल. प्राप्त दरपत्रके कोणतेही कारण न देता नाकारण्याचा तसेच सदर प्रक्रिया कोणत्याही टप्यावर रद्द करण्याचा हक्क जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी राखून ठेवला आहे.

(राजीव निवतकर)
**जिल्हाधिकारी, मुंबई शहर**

Scanned by CamScanner